पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काळे ज्वेलर्स
सोने | चांदी | हिरे | नवरत्न
9601222777
9615222777
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १६१। किंमत - ५ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार १४/०७/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# जयहिंद लोकचळवळीचा युवा शेतकरी सन्मान

## उत्पादनासोबत प्रक्रिया, निर्यात आणि ब्रँडिंगची गरज - मंत्री जयकुमार रावल




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जयहिंद लोकचळवळीच्या कृषी विभागातर्फे आयोजित 'राज्यस्तरीय युवा शेतकरी सन्मान सोहळा २०२६' उत्साहात पार पडला. नाशिक येथे झालेल्या या सोहळ्यात राज्यभरातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीत नावीन्यपूर्ण प्रयोग करणाऱ्या युवा शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. हरितक्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे यंदा दहावे वर्ष होते.


लोकनेते बाळासाहेब थोरात आणि जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार सत्यजीत तांबे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येतो. कार्यक्रमाला राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, दिंडोरीचे खासदार भास्कर भगरे, सह्याद्री फार्मर्सचे संस्थापक विलास अण्णा शिंदे, आमदार मनोज कायंदे, जय हिंद महिला मंचच्या अध्यक्षा दुर्गाताई तांबे, प्रवीण जाधव, नामदेवराव गुंजाळ, प्रा. सुनील बच्छाव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. सुधीर तांबे यांनी जयहिंद लोकचळवळीच्या २८ वर्षांच्या कार्याचा आढावा घेत, शेती, शिक्षण, आरोग्य, युवक आणि महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून सुदृढ समाज उभारण्याचा चळवळीचा संकल्प असल्याचे सांगितले. कृषी क्षेत्रात उत्पादकता वाढ, समूहशेती, इंटिग्रेटेड फार्मिंग, चांगल्या कृषी पद्धती आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून शेती अधिक फायदेशीर करण्याची गरज त्यांनी मांडली. पुरस्कार विजेते शेतकरी हे इतरांसाठी प्रेरणास्थान बनून आपले अनुभव गावागावात पोहोचवावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी हरितक्रांतीचे शिल्पकार वसंतराव नाईक, यशवंतराव चव्हाण आणि अण्णासाहेब शिंदे यांच्या योगदानाचे स्मरण करत, देशाच्या प्रगतीचा पाया हा शेतीत असल्याचे अधोरेखित केले. हवामान बदल, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील अस्थिरता आणि विक्री व्यवस्थेतील अडचणी ही शेतीसमोरील प्रमुख आव्हाने त्यांनी सांगितले. (पान ४ वर)

# "आयाराम"मुळे संघ प्रदुषित

## स्वामी गोविंददेव गिरी महाराजांनी टोचले कान



पुणे (वृत्तसंस्था)

भाजपमध्ये गेल्या काही वर्षांत झालेल्या मोठ्या पक्षप्रवेशांवर प्रथमच संघ परिवारातील एका महत्त्वाच्या धार्मिक व्यक्तिमत्त्वाने उघडपणे भाष्य केल्याने राज्याच्या राजकारणात नवी चर्चा सुरू झाली आहे. अयोध्येतील रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी जशी गंगा नाल्यांमुळे प्रदूषित होते, तसाच आयारामांमुळे संघ परिवार प्रदूषित होत आहे, अशी केलेली टिप्पणी भाजपच्या सध्याच्या पक्षप्रवेशाच्या धोरणावर थेट प्रश्न उपस्थित करणारी मानली जात आहे. गेल्या काही वर्षांत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि इतर पक्षांतील अनेक प्रभावशाली नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

यातील अनेक नेते हिंदुत्वाच्या भूमिकेच्या विरोधात होते. मात्र कालांतराने त्यांनाच पक्षात महत्त्वाची जबाबदारी मिळाल्याने भाजपच्या जुन्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी वाढल्याची चर्चा वेळोवेळी समोर आली आहे. याच पार्श्वभूमीवर पुण्यातील एका कार्यक्रमात बोलताना स्वामी गोविंददेव गिरी यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ज्यांना कधी संघ पटला नाही, हिंदुत्व पटले नाही, त्यांना नैतिकतेची जाणीवही नसते. अशा लोकांची मोठ्या प्रमाणावर आयात होत आहे आणि त्यामुळे संघ परिवाराच्या मूळ संस्कारांवर परिणाम होण्याची भीती आहे.

त्यांनी वापरलेले गंगा आणि नाले हे रूपक आता राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरले आहे. भाजपमध्ये सातत्याने होत असलेल्या पक्षप्रवेशांमुळे मूळ कार्यकर्त्यांना डावलले जात असल्याची टीका विरोधकांकडून होत असते. अनेक ठिकाणी उमेदवारीपासून पदवाटपापर्यंत नव्याने आलेल्या नेत्यांना प्राधान्य मिळत असल्याची नाराजी पक्षातील जुन्या कार्यकर्त्यांनीही वेळोवेळी व्यक्त केली आहे.

स्वामी गोविंददेव गिरी यांनी संघाच्या शताब्दी वर्षाचा उल्लेख करत डॉ. केशव बळीराम हेडगेवार आणि (पान ६ वर)

# गुन्हेगारीचे कंबरडे मोडणार !

## पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानग - श्रीरामपूर येथे घडलेल्या खून प्रकरणानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेत गुन्हेगारीविरोधात मोठी मोहीम उघडली आहे. या खून प्रकरणात ज्यांचा एक टक्काही सहभाग आढळेल, त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई केली जाईल. कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, असा स्पष्ट आणि कठोर इशारा त्यांनी दिला.

पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी स्पष्ट केले की, संघटित गुन्हेगारी, खंडणी, दहशत, अवैध धंदे आणि गुन्हेगारांच्या टोळ्यांवर आता विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणा पूर्ण ताकदीने कामाला लागली असून प्रत्येक संशयिताची कसून चौकशी सुरू आहे. नागरिकांना विश्वासात घेत पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी आवाहन केले की, श्रीरामपूरमधील कोणत्याही गुन्हेगार, अवैध धंदा, खंडणीखोर किंवा समाजकंटकांविषयी माहिती असल्यास नागरिकांनी थेट माझ्याशी संपर्क साधावा. तुमची ओळख गोपनीय ठेवली जाईल आणि संबंधितांवर तातडीने कठोर कारवाई केली जाईल. सुदर्शन यांनी सांगितले की, कायद्यापेक्षा कोणीही मोठा नाही. गुन्हा करणारा, गुन्ह्याला मदत करणारा, आश्रय देणारा किंवा कटात सहभागी असणारा कोणताही व्यक्ती कायद्याच्या कचाट्यातून सुटणार नाही.

# जेजुरीजवळ वारकऱ्यांवर काळाचा घाला

## ट्रकच्या धडकेत तीन महिला वारकऱ्यांचा मृत्यू



पंढरपूर (वृत्तसंस्था)

आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने पंढरपूरकडे निघालेल्या वारकऱ्यांवर आज सकाळी मोठा अनर्थ ओढावला. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यासोबत पायी चालत निघालेल्या वारकऱ्यांना जेजुरी परिसरातील भोंगळे मळा येथे एका भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात तीन महिला वारकऱ्यांचा मृत्यू झाला असून, चार वारकरी गंभीर जखमी झाले आहेत.

सध्या राज्यभरातून लाखो वारकरी ऊन-पावसाची तमा न बाळगता पायी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होत आहेत. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी सासवडचा मुक्काम आटोपून आज जेजुरीच्या दिशेने मार्गस्थ झाली होती. सकाळच्या वेळी अनेक वारकरी जेजुरीच्या दिशेने पायी चालत निघाले होते. या मार्गावर सुरक्षेच्या कारणास्तव एकाच बाजूने वाहने सोडली जात होती.

प्राथमिक माहितीनुसार, जेजुरी नजीकच्या भोंगळे मळा परिसरात मागून आलेल्या एका भरधाव ट्रकने वारकऱ्यांच्या टेम्पोला आणि पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की यात तब्बल सहा वारकरी चिरडले गेले.अपघात घडताच परिसरातील नागरिक आणि इतर वारकऱ्यांनी तात्काळ मदतकार्य सुरू केले. जखमी झालेल्या सर्व सहा वारकऱ्यांना तातडीने नजीकच्या स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. (पान २ वर)

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
नियम व अटी लागू.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
स्पर्धेतून आकर्षक गिफ्ट
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

PBM Jeweller's
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# आश्वी बुद्रुकमध्ये अतिक्रमण हटाव कारवाई वादात

## ग्रामपंचायत प्रशासनाकडून मात्र समर्थन



युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथे ग्रामपंचायतीने विकासाच्या नावाखाली केलेल्या अतिक्रमणावरील कारवाईवरून नवा वाद निर्माण झाला आहे. या कारवाईत मांग-गारुडी समाजाच्या घरालगत असलेली शौचालय, बाथरूम आणि इतर अन्य बांधकामे पाडण्यात आल्याने ही कारवाई दडपशाही आणि द्वेषातून करण्यात आल्याचा गंभीर आरोप स्थानिक रहिवाशांनी केला. तर, ग्रामपंचायत प्रशासनाने ही कारवाई कायदेशीर असल्याचे म्हणत कारवाईचे समर्थन केले आहे. शुक्रवारी (दि.१०) ग्रामपंचायत प्रशासनाने बाजारतळालगत असलेल्या नव्याने तयार करण्यात आलेल्या सिमेंट काँक्रिट रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमण हटाव मोहीम राबविली.

मात्र यामुळे अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या मांग-गारुडी समाजाचे मोठे नुकसान झाल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. तसेच ग्रामपंचायतीने कोणतीही पूर्वसूचना किंवा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता अचानक कारवाई केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. यावेळी कारवाई दरम्यान ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी आणि रहिवासी यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. त्यामुळे काहीकाळ तणाव निर्माण झाला होता. मात्र, पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने तणाव निवळला आहे. आशिष शेळके यांनी घटनेचा निषेध केला. ते म्हणाले आश्वी बुद्रुक येथे अवैध धंदे जोमाने सुरू असताना, दुसरीकडे शनिवारी सकाळी रिपाइंचे गोर-गोरगरीबांची अतिक्रमणे तोडण्यासाठी मात्र प्रशासनाची तत्परता दिसून येते, ही दुटप्पी भूमिका संशयास्पद आहे. त्यामुळे अवैध धंदे आणि अन्यायकारक अतिक्रमण कारवाईच्या दोषींवर कारवाई झाली नाही, तर येत्या बुधवारी (दि.१४) पोलीस ठाण्यावर मोर्चा आणू, असा इशारा दिला. दरम्यान, यावेळी पोलीस प्रशासनाला निवेदन देखील देण्यात आले आहे.

### संपूर्ण प्रक्रिया कायदेशीर

**ग्रामपंचायतने गावात राबवलेली अतिक्रमण हटाव मोहीम ही पूर्णपणे कायदेशीर प्रक्रिया असून ती टप्प्याटप्याने सुरू राहणार आहे. कोणतीही राजकीय द्वेषभावना अथवा विशिष्ट समाजाच्या विरोधात ही कारवाई करण्यात आलेली नाही. यासाठी विशेष ग्रामसभा, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि जिल्हा परिषदेची प्रशासकीय परवानगी घेऊन ही प्रक्रिया पार पडली आहे. याठिकाणी सार्वजनिक गटारीवर शौचालय आणि बाथरुमचे बांधकाम करण्यात आले होते. त्यामुळे सांडपाण्याचा निचरा होण्यास अडथळा ठरणारी अतिक्रमणे काढली आहेत. याबाबत संबंधित नागरिकांना वेळोवेळी पूर्वसूचना आणि लेखी नोटिसा देखील दिल्या होत्या. त्यामुळे ग्रामस्थांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता, विकासकामांना सहकार्य करावे.**

**– नामदेव शिंदे (सरपंच, आश्वी बुद्रुक)**

# प्रत्येक बांधकाम कामगारांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचवणार : आ. खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळामार्फत राज्यातील २१ प्रकारच्या बांधकाम कामगारांना विविध शासकीय योजनांचा लाभ दिला जात असून, संगमनेर तालुक्यात सध्या सुमारे २७ हजार कामगार लाभार्थी आहेत. हा आकडा ५० हजारांपर्यंत नेण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जातील, असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

संगमनेर येथील मातोश्री लॉन्समध्ये आयोजित कार्यक्रमात बांधकाम कामगारांना भांडी संच तसेच त्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश आमदार खताळ यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. यावेळी शिवसेना, भाजप व महायुतीचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले, महायुती सरकार सर्वसामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून विविध लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवत आहे. शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कोणीही पैशांची मागणी करत असल्यास नागरिकांनी १०६४ या भ्रष्टाचारविरोधी हेल्पलाईनवर किंवा त्यांच्या संपर्क कार्यालयाशी तक्रार करावी. कोणत्याही एजंट किंवा दलालामार्फत अर्ज करू नयेत, तसेच पात्र लाभार्थ्यांना कोणत्याही राजकीय भेदभावाशिवाय लाभ मिळेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी त्यांनी २०१९ मधील वंचित शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ, साकूर पठार उपसा सिंचन योजना, भोजापूर चारीसाठी मंजूर निधी, कवठे-मलकापूर औद्योगिक वसाहत, कामगार रुग्णालय, महिला व बाल रुग्णालय तसेच पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पासाठी सुरू असलेल्या पाठपुराव्याची माहिती दिली.

कार्यक्रमात विठ्ठल घोरपडे, संतोष रोहम, राजेंद्र सोनवणे, गुलाब भोसले, श्रीकांत गोमासे, सुशील शेवाळे आणि संगीता पुंड यांनीही मनोगत व्यक्त केले.

### संगमनेरमध्ये भांडी संच व शिष्यवृत्ती धनादेशांचे वितरण



### एजंटांवर कारवाईचा इशारा

**बांधकाम कामगारांच्या नावावर पैसे उकळणाऱ्या एजंटांविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. श्रीरामपूरमध्ये एका एजंटवर कारवाई करण्यात आली असून, संगमनेरमध्येही अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी लक्ष ठेवण्यात आले आहे. एजंट किंवा दलालांमार्फत व्यवहार करणाऱ्यांवरही कारवाई होईल, असा इशारा बांधकाम अधिकारी स्वप्निल जाधव यांनी दिला.**

### आरटीओ कार्यालय व कामगार रुग्णालयाबद्दल अभिनंदन

**आमदार अमोल खताळ यांच्या प्रयत्नातून संगमनेरला आरटीओ कार्यालय व कामगार रुग्णालय मंजूर झाल्याबद्दल अश्वी मंडळाचे अध्यक्ष गोकुळ दिघे, विठ्ठल घोरपडे आणि गुलाब भोसले यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यास मंजुरी दिली.**

## पान १ वरून जेजुरीजवळ वारकऱ्यांवर...

मात्र, उपचारादरम्यान यापैकी तीन महिला वारकऱ्यांचा उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. तर उर्वरित तीन जखमी वारकऱ्यांवर सध्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून त्यांचीही प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

जेजुरीजवळ वारकऱ्यांच्या वाहनाला झालेल्या भीषण अपघातावरून काँग्रेस नेत विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर टीका केली आहे. आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी शासन पार पाडण्यात अपयशी ठरल्याचा आरोप त्यांनी केला. गेल्या काही वर्षांत वारीतील अपघातांचे प्रमाण वाढत असून, या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या वारकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करत जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थनाही त्यांनी व्यक्त केली.

## सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेत ३१ जुलै पर्यंत सहभागी व्हा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- राज्यात सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू करण्यात आली असून चालू खरीप हंगामात सरासरी उत्पादन उंबरठा उत्पादनापेक्षा कमी झाल्यास नुकसान भरपाई मिळणार आहे. हवामान खात्याचा अंदाज लक्षात घेता शेतकऱ्यांच्या आर्थिक संरक्षणासाठी ही योजना महत्त्वाची असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२६ पूर्वी योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी आयुक्तालयाचे संचालक विनयकुमार आवटे यांनी केले आहे.

खरीप हंगामात भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळे, सोयाबीन, कापूस व खरीप कांदा या १४ पिकांसाठी योजनेचा लाभ घेता येणार आहे. यासाठी विमा संरक्षित रकमेच्या दोन टक्के हप्ता भरावा लागणार असून कापूस व कांदा या नगदी पिकांसाठी पाच टक्के हप्ता आकारला जाणार आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी किमान ०.१० हेक्टर क्षेत्रावर पीक असणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना राष्ट्रीय पीक विमा पोर्टलवर बँक, सामूहिक सेवा केंद्र किंवा स्वतः ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. अर्जासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक व आधारशी संलग्न बँक खाते आवश्यक आहे. तसेच डिजिटल क्रॉप सर्वेअंतर्गत पिकाची नोंद करणे बंधनकारक असून त्यातील नोंद व विमा अर्जातील पिकामध्ये तफावत आढळल्यास विमा अर्ज रद्द करण्यात येईल. चुकीच्या मार्गाने अर्ज करून गैरफायदा घेतल्याचे आढळल्यास संबंधित शेतकऱ्यांना पुढील पाच वर्षे कृषी विषयक योजनांचा लाभ मिळणार नाही.

# वारी - कर्मयोग आणि भक्तियोगाचा अद्वितीय संगम



महाराष्ट्रातील आषाढी आणि कार्तिकी वारी ही वारकरी संप्रदायासाठी जणू दसरा आणि दिवाळीच असते. खऱ्या अर्थाने पालखी सोहळा म्हणजे कर्मयोग आणि भक्तियोग यांचा दिव्य संगम होय. ज्येष्ठ पत्रकार आणि नवाकाळचे संपादक नीलकंठ खाडिलकर म्हणतात, वारकऱ्यांचा कर्मयोग संपून भक्तियोग सुरू होतो आणि ते आपल्या वेळेचा खऱ्या अर्थाने सदुपयोग करून घेतात.

आजच्या स्पर्धात्मक युगात माणूस सुख, शांती आणि समाधानाच्या शोधात धावत आहे. घरातून ऑफिस, ऑफिसमधून दुकान, पुन्हा घर, लिफ्ट, कार, हॉस्पिटल आणि शेवटी आयुष्यभर औषधांच्या गोळ्यांवर जगणे-हेच का खरे जीवन? पैसा कमावण्याच्या नादात माणूस स्वतःलाच हरवून बसला आहे. मग मानसिक शांतता आणि आरोग्य मिळवण्यासाठी तो भोंदू बाबांच्या मागे धावत राहतो, पैसा खर्च करतो; पण शेवटी पदरी पडते ती निराशाच.

याउलट, दैनंदिन धावपळीतून थोडा वेळ काढून पालखीचे दर्शन घेणे, वारकऱ्यांसोबत काही अंतर पायी चालणे आणि नामस्मरणाचा आनंद अनुभवणे, हीच खरी जीवनातील शांती आहे. सुख आणि समाधान बाहेर कुठे शोधण्याची गरज नाही; ते या वारीच्या अनुभवातच सामावलेले आहे.

पालखी सोहळ्यात आपल्याला एक निरोगी आणि शिस्तबद्ध समाज दिसतो. वारकऱ्यांना रोज किती अंतर चालायचे याची कल्पना असते. त्यानुसार ते शरीर आणि मनाची पूर्वतयारी करून वारीत सहभागी होतात. त्यांच्या मुखी अखंड विठ्ठलनाम असते-

**बोलावा विठ्ठल। पहावा विठ्ठल। करावा विठ्ठल जीवभाव।।**

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून सामाजिक आणि आध्यात्मिक क्रांती घडवून आणली. त्यांनी नामस्मरणाचा सोपा मार्ग जनतेसमोर ठेवला. संत नामदेवांनी या नामभक्तीचा प्रसार उत्तर भारत आणि पंजाबपर्यंत नेला.

संत बहिणाबाई वारकरी संप्रदायाचे योगदान अत्यंत सुंदर शब्दांत सांगतात-

**संत कृपा झाली। इमारत फळा आली।।**
**ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।।**
**नामा तयाचा किंकर। त्याने केला हा विस्तार।।**
**जनार्दन एकनाथ। ध्वज उभारिला भागवत।।**
**भजन करा सावकाश। तुका झालासे कळस।।**

या अभंगातून वारकरी परंपरेची उभारणी आणि संतांच्या कार्याची अखंड परंपरा स्पष्ट होते.

**संतश्रेष्ठ तुकाराम महाराज सांगतात-**

**भाव तोची देव, देवाचिया चाडे आळवावे देवा।।**

देव मिळवण्यासाठी भक्तिभाव हाच सर्वात सोपा मार्ग आहे. म्हणूनच ते पुढे म्हणतात-

**भावे गावे गीत। शुद्ध करूनि या चित्त।।**
**तुझं व्हावा आहे देव। तरी हा सुलभ उपाव।।**

तुकाराम महाराजांची भक्ती निरपेक्ष होती. त्यांना कोणतीही ऐहिक अपेक्षा नव्हती. त्यांना फक्त संतसंग आणि विठ्ठलनाम हवे होते.

**विठू भक्तीचा डांगोरा। कळी काळाशी दरारा।।**
**तुका म्हणे करा। जय जयकार आनंदे।।**

तुकाराम महाराजांसाठी सुखात, दुःखात, प्रत्येक क्षणी विठ्ठलच होता-

**विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी। विठ्ठल तोंडी उच्चारा।।**
**विठ्ठल अवघ्या भांडवला। विठ्ठल बोला विठ्ठल।।**
**विठ्ठल नाद विठ्ठल भेद। विठ्ठल छंद विठ्ठल।।**
**विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा। तुकया मुखा विठ्ठल।।**

पालखी सोहळ्यात प्रत्येक वारकऱ्याच्या मुखी विठू माऊली, विठू माऊली हा अखंड गजर असतो. गळ्यात तुळशीमाळ, कपाळी बुक्का आणि मुखी विठ्ठलनाम-हीच त्यांची खरी ओळख असते. पायी चालणे, संयम, शिस्त आणि नामस्मरण यामुळे त्यांचे शरीर आणि मन दोन्ही निरोगी राहते.

पंढरपूरचा विठ्ठल कमरेवर हात ठेवून जणू प्रत्येक भक्ताला सांगत असतो-भिऊ नकोस; भवसागराचे पाणी कमरेएवढेच आहे. या विठ्ठलाकडे कोणतेही अवघड कर्मकांड नाही. तो साधा, भोळा आणि भक्तांच्या हाकेला धावून जाणारा आहे. त्याच्याकडे मागण्यासाठी काही नसते; असते ती फक्त दर्शनाची आस. एकदा डोळे भरून विठ्ठलाचे दर्शन झाले की, भक्त पुन्हा आपल्या कर्मयोगाकडे परततो. अशा प्रकारे कर्मयोगाने सुरू झालेला दिंडीचा प्रवास भक्तियोगातून महायोगात परिवर्तित होतो आणि पंढरपूरहून परतताना पुन्हा कर्मयोगाची वाट धरतो. हाच पंढरीच्या वारीचा खरा संदेश आहे.

नीलकंठ खाडिलकर यांचे शब्द येथे अत्यंत समर्पक वाटतात-निरोगी समाज काय असतो, हे रोगी समाजाने वारकऱ्यांकडून शिकावे.

पंढरीची वारी ही केवळ धार्मिक यात्रा नसून, ती शिस्त, समता, सेवा, आरोग्य, भक्ती आणि कर्म यांचा अद्वितीय संगम आहे. म्हणूनच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेतील ही वारी आजही लाखो भाविकांना जीवन जगण्याची नवी दिशा देत आहे.र

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

## जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर

भूमि संपादन, पनर्वसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनयम, २०१३ चे कलम ११ खालील प्राथमिक अधिसूचना

### अधिसुचना

**क्र. भूस/मौजे आखोणी ता. कर्जत जि. अहिल्यानगर / एलएक्यू/एसआर/ ०२/२०२५**

ज्या अर्थी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (ङ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-२०२०-प्र.क्र.५/अ-३ दिनांक ०३ ऑगस्ट २०१५ (यात यापूढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनियमांच्या कलम ३ च्या खंड (झेड ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी अहमदनगर जिल्हयाच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमिनी असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट कलम (१) च्या तरतुदींन्वये याव्दारे असे अधिसुचीत करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुर्नवसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडसैल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे;

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम ५ अनुसार कोणतीही व्यक्ती, हि अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

परंतु, काही जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही;

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अ नुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापूढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

त्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ३), अहिल्यानगर यास पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसुची – एक
### जमिनीचे वर्णन
### गाव मौजे आखोणी, तालुका कर्जत, जिल्हा अहिल्यानगर

| अनुक्रमांक्र | भूमापन किंवा गट क्रमांक | आवश्यक जमिनीचे अंदाजित क्षेत्र हेआर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | ८३/१ | ०.०३ |
| २ | ८३/२ | ०.६२ |
| ३ | ८३/३ | ०.७२ |
| ४ | ८४ | ०.०२ |
| ५ | १२९ | १.४९ |
| ६ | १३० | ०.५३ |
| ७ | १३१ | ०.०५ |
| ८ | १४१ | ०.०४ |
| ९ | १४२ | ०.०४ |
| १० | १४३ | ०.०६ |
| ११ | १४४ | ०.२० |
| १२ | १४५ | ०.५० |
| १३ | १४६ | ०.३५ |
| १४ | १४७/२ | ०.०९ |
| १५ | १६४ | ०.७० |
| १६ | १६६ | ०.४० |
| १७ | १६८/१ | ०.१९ |
| १८ | १६८/२ | ०.०२ |
| १९ | १६९ | ०.३७ |
| २० | १७०/१ | ०.४१ |
| २१ | १८१/१ | ०.२८ |
| २२ | १८२ | ०.७२ |
| २३ | १८३/३ | ०.०२ |
| २४ | १८५ | ०.५१ |
| २५ | १८६/२/१ | ०.४८ |
| २६ | १८८/१ | ०.१२ |
| २७ | १८९/१ | ०.०९ |
| एकूण | | ९.०५ |

### अनुसूची – दोन
### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** : कुकडी डावा कालवा चिलवडी शाखा कालव्याची रशिन वितरीकेवरील कि.मी.१४ ते १८ (एस.आर.क्र.४७/१४१/२००६) चे बंधपत्र

**प्रकल्प कामाचे वर्णन –** : कुकडी डावा कालवा चिलवाडी शाखा कालव्याची राशिन वितरीकेवरील कि.मी. १४ ते १८ (एस.आर.क्र.४७/१४१/२००६ चे बांधकामाकरिता मौजे आखोणी, तालुका कर्जत जिल्हा अहिल्यानगर येथील एकूण ९.०५ हे आर जमीन संपादित करणे.

**समाजाला होणारे लाभ –** : सिंचन सुविधा

### अनुसूची – तीन
### बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे – लागू नाही
### अनुसूची – चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धाराचा सारांश. प्रस्तुत प्रकरणी मा विभागीय आयुक्त नाशिक यांचे कार्यालय (भूसंपादन शाखा) यांचे पत्र क्र. जाक्र भुसं/कार्य-३/एसआयएसीआर-४९/२०२६/ई-ऑफिस क्र.१८०१७/२/२०२६ दि. १६/०५/२०२६ नुसार भुमि संपादन, पुनर्वसन पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ प्रकरण दोनच्या प्रकरण तीनच्या तरतुदी लागु करण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.

### अनुसूची – पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे पदनाम : लागु नाही
ब. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे पदनाम : लागु नाही
क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकीय नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अधिसुचनेचा तपशिल : लागु नाही

टिप – उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.३), अहिल्यानगर यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

**सुभाष ए. दळवी**
**प्र.उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र .३**
**जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर**

**दिनांक – २२.०६.२०२६**
**ठिकाण – अहिल्यानगर**

जिमाका/नगर/जाहि/५९/२०२६

संचालक, संजिवनी हॉस्पिटल
१३ जुलै
मा. डॉ
जगदिश वाबळे

यांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संचालक, सुप्रीम पॅकेजिंग
१४ जुलै
मा. श्री.
अभिजित दिघे

यांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्यूरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# कोल्हार - घोटी महामार्गावर धुळ साफ करण्याचे काम सुरु



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - कोल्हार-घोटी राज्य मार्गावरील अकोले ते संगमनेर या खराब रस्त्यावर डांबरीकरणाचे पॅच मारल्यानंतर ठेकेदाराकडून टाकण्यात आलेल्या क्रशमुळे प्रचंड धूळ उडत होती. दुचाकीचालक आणि स्थानिकांना या धुळीचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. यासंदर्भात माध्यमांनी आवाज उठवल्याने तात्काळ परिणाम झाला असून संबंधित ठेकेदाराने ट्रॅक्टरच्या साहाय्याने रस्त्यावरील धूळ गोळा करण्याचे काम सुरू केले आहे.

धांदरफळ येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत या प्रश्नावर आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानंतर प्रशासनाने दखल घेत उपाययोजना सुरू केल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

असे असले तरी संगमनेर ते चिखली रस्त्यावर अनेक ठिकाणी डांबराचे पॅच मारण्याचे काम अद्याप शिल्लक आहे. पावसामुळे रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून नवीन वाहनचालकांना त्याचा नाहक त्रास होत आहे. या मोठ्या खड्ड्यांसह रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर असलेल्या गतिरोधकांमुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे नुकसान होत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्वतः या रस्त्यावरून एकदा प्रवास करून येथील स्थिती अनुभवावी. तसेच तातडीने खड्डे बुजवून अनावश्यक गतिरोधकांची संख्या कमी करावी अशी मागणी या मार्गावरून प्रवास करणारे वाहनचालक आणि प्रवाशांनी केली आहे.

# निधीअभावी सारथीचे संगणक प्रशिक्षण ठप्प

सोलापूर (वृत्तसंस्था)

मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या समाजातील तरुण-तरुणींना संगणक आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या दृष्टीने स्वावलंबी बनवण्यासाठी सारथी संस्थेने छत्रपती संभाजी महाराज युवा व्यक्तिमत्त्व विकास व संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम (सीएसएमएस डीईईपी) सुरू केला. मात्र, गेल्या वर्षभरापासून सोलापूरसह राज्यभरातील प्रशिक्षण केंद्रांना निधीच दिला जात नसल्याने हा प्रशिक्षण कार्यक्रम ठप्प झाला आहे. त्यामुळे गेल्या या कोर्ससाठी नोंदणी केलेल्या ८० हजारांपैकी केवळ ३८ हजार तरुण-तरुणींचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून ४२ हजार जणांचे प्रशिक्षण अर्धवट राहिल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.

सारथीच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्त्व विकास व संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम २०२३ मध्ये सुरू केला. सहा महिन्यांच्या या संगणक डिप्लोमा कोर्समध्ये संगणक कौशल्ये, संवाद कौशल्ये आणि इंग्रजी भाषेचे प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण घेतल्यानंतर उमेदवारांना विविध संगणक संबंधित शाखांमध्ये नोकरीच्या संधी आहेत. कोर्स सुरू झाल्यानंतर दोन वर्षात पहिल्या टप्प्यात ४० हजार आणि दुसऱ्या टप्प्यात ४० हजार तरुण आणि तरुणींनी या कोर्ससाठी नोंदणी केली. सुरुवातीला हा कोर्स चांगला चालला, पण जून २०२५ पासून निधीअभावी या कोर्सची नोंदणी बंद झाली आहे.

# दारूविरोधात लिंगदेवमध्ये जनआंदोलन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यातील लिंगदेव येथे अवैध दारूविक्रीविरोधात ग्रामस्थ, महिला आणि युवकांनी एकजूट दाखवत दारूबंदी समितीची स्थापना केली. दारूमुक्त लिंगदेव - व्यसनमुक्त समाज हा संकल्प स्वीकारत गावातून अवैध दारूविक्री कायमस्वरूपी हद्दपार करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला. बैठकीत दारूबंदी चळवळीचे प्रणेते हेरंब कुलकर्णी यांनी व्यसनमुक्त समाज ही काळाची गरज असल्याचे सांगत दारूबंदी ही लोकचळवळ बनविण्याचे आवाहन केले. तर प्रा. मच्छिंद्र देशमुख यांनी दारूमुळे उद्ध्वस्त होणाऱ्या कुटुंबांची उदाहरणे देत समाजासमोर गंभीर प्रश्न उपस्थित केले.

बैठकीदरम्यान अनेक महिलांनी दारूमुळे होणाऱ्या कौटुंबिक, आर्थिक आणि सामाजिक समस्यांना वाचा फोडली. कष्टाने कमावलेला पैसा दारूत खर्च होत असून त्यामुळे कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत असल्याची वेदना महिलांनी व्यक्त केली. महिलांच्या अनुभवांनी सभागृहातील वातावरण भावनिक झाले. यावेळी सरपंच अमित घोमल, विमल मुंढे, प्रभाकर फापाळे, प्रदीप हासे, कल्पना फापाळे यांच्यासह अनेक मान्यवरांनी दारूबंदीला पाठिंबा दर्शवत अवैध दारूविक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कायदेशीर कारवाईची मागणी केली. बैठकीच्या शेवटी सर्व उपस्थितांनी हात वर करून दारूमुक्त लिंगदेव - व्यसनमुक्त समाज हा संकल्प पुन्हा उच्चारला. तसेच जनजागृती, प्रशासनाशी समन्वय आणि कायदेशीर मार्गाने दारूविक्रीविरोधातील लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. ग्रामस्थांच्या या एकजुटीमुळे लिंगदेवमध्ये दारूबंदीची नवी चळवळ उभी राहिल्याचे चित्र दिसून आले.

# श्रीगोंद्यात तलवारीचा थरार; हल्ल्यात व्यक्तीचे दोन्ही पंजे तोडले

युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीगोंदा - अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यात राजकीय वैमनस्य आणि जुन्या गुन्ह्याच्या रागातून घडलेल्या अत्यंत क्रूर हल्ल्याने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. सहा जणांच्या टोळक्याने रोहिदास हरिश्चंद्र दांगडे (वय ४८, रा. घुगलवडगाव) यांच्यावर तलवारीने सपासप वार करत अमानुष हल्ला केला. या भीषण हल्ल्यात त्यांच्या दोन्ही हातांचे पंजे मनगटापासून तुटले असून डोक्यावरही गंभीर वार करण्यात आले आहेत. त्यांच्यावर पुण्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

शनिवारी (दि. ११) सायंकाळी सुमारे सव्वाचार वाजण्याच्या सुमारास शहरातील मांडवगण रोडवरील गणपती मळ्याजवळील सुपेकर वस्तीवरील एका घरात ही थरारक घटना घडली. याप्रकरणी जखमी रोहिदास दांगडे यांच्या मुलगी राधिका दांगडे यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार परशुराम सुभाष दांगडे, अभयराज संजय दांगडे, सागर ऊर्फ प्रदीप सुनील दांगडे, दत्तात्रय गोविंद दांगडे, विक्रम तुळशीराम दांगडे आणि संग्राम ऊर्फ तात्याराम ज्ञानदेव पवार (सर्व रा. घुगलवडगाव) यांच्याविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी विक्रम दांगडे याला अटक केली असून इतर आरोपी फरार आहेत.

हल्ल्यावेळी जीव वाचविण्यासाठी रोहिदास दांगडे यांनी रस्त्यालगतच्या एका घरात आश्रय घेतला. मात्र, संतापलेल्या हल्लेखोरांनी त्या घरातही घुसून त्यांच्यावर तलवारीने वार सुरूच ठेवले. घरात उपस्थित असलेल्या तीन महिलांपैकी नुकतेच शस्त्रक्रिया झालेल्या एका वृद्ध महिलेने हल्लेखोरांना माझ्या घरात असे करू नका अशी आर्त विनंती करत थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, हल्लेखोरांनी कोणतीही दया न दाखवता हल्ला सुरूच ठेवला. या धक्क्याने ती महिला जागीच बेशुद्ध पडली.

तलवारीचे वार इतके भीषण होते की रोहिदास दांगडे यांचे दोन्ही हातांचे पंजे मनगटापासून तुटले. या अमानुष घटनेमुळे श्रीगोंदा परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

ही घटना केवळ एका व्यक्तीवरील हल्ला नसून राज्यातील वाढत्या गुन्हेगारीचे आणि कायद्यावरील कमी होत चाललेल्या धाकाचे गंभीर उदाहरण असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. राजकीय वैमनस्यातून अशा प्रकारचे निर्घृण हल्ले होत असतील, तर सर्वसामान्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिकच गंभीर बनत आहे. फरार आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

# संतांचे संगती... आत्मज्ञानाची प्रगती

## "नको देवराया अंत आता पाहू। प्राण हा सर्वथा जाऊ पाहे।।"

### संत कान्होपात्रा



वारकरी संप्रदायातील संत कान्होपात्रा या भक्ती, त्याग, स्वाभिमान आणि आत्मसमर्पणाचे अद्वितीय प्रतीक मानल्या जातात. समाजातील बंधने, रूढी आणि अन्याय यांना न जुमानता त्यांनी विठ्ठल भक्तीचा मार्ग स्वीकारला आणि आपल्या जीवनाला एक वेगळे आध्यात्मिक परिमाण दिले. त्यांचे जीवन संघर्षमय असले, तरी ते तितकेच प्रेरणादायी आणि भक्तिमय आहे.

संत कान्होपात्रा यांचा जन्म पंधराव्या शतकात सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथे झाला. मंगळवेढा ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. संत चोखामेळा आणि संत दामाजीपंत यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या या भूमीतच कान्होपात्रांचा जन्म झाला. त्यांच्या आईचे नाव शामा होते. शामा ही त्या काळातील प्रसिद्ध गणिका होती. तिच्या घरी संपत्ती, ऐश्वर्य, कला आणि वैभवाची कमतरता नव्हती, मात्र मनःशांती नव्हती. संगीत, नृत्य आणि गायनाचे वातावरण असल्यामुळे कान्होपात्रांनाही या कलांचे उत्तम शिक्षण मिळाले. त्यांचा आवाज अत्यंत मधुर होता आणि त्या उत्कृष्ट नृत्यांगना होत्या. त्यांच्या सौंदर्याची आणि कलेची ख्याती दूरवर पसरली होती. मात्र, या ऐश्वर्यामागील वेदना आणि स्त्रीकडे केवळ उपभोगाची वस्तू म्हणून पाहणारी समाजाची मानसिकता त्यांना अस्वस्थ करत होती. रूप आणि यौवन हे स्त्रीसाठी कधी कधी शाप ठरू शकते, याची जाणीव त्यांना लहान वयातच झाली होती.

कान्होपात्रांच्या आईची इच्छा होती की त्यांनी एखाद्या श्रीमंत सरदाराचा किंवा राजाचा आश्रय स्वीकारावा. पण कान्होपात्रांचे मन या भौतिक जगात रमले नाही. त्याच काळात मंगळवेढ्यातून अनेक वारकरी टाळ-मृदंगाच्या गजरात पंढरपूरला जात असत. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद, विठ्ठलावरील श्रद्धा आणि भक्तीतील समाधान पाहून कान्होपात्रा प्रभावित झाल्या. एकदा त्यांनी एका वारकऱ्याला विचारले, तुमचा विठ्ठल कसा आहे? त्यावर त्या वारकऱ्याने सांगितले की विठ्ठल हा जात, पात, कुल किंवा रूप पाहत नाही; तो केवळ भक्तीचा स्वीकार करतो. हे शब्द कान्होपात्रांच्या मनात घर करून राहिले. त्यांनी विठ्ठलालाच आपले सर्वस्व, आपला स्वामी आणि आपला जीवनसाथी मानले. अखेरीस त्यांनी घर, संपत्ती आणि वैभवाचा त्याग केला आणि पंढरपूरची वाट धरली. पंढरपुरात पोहोचल्यावर त्यांनी स्वतःला पूर्णपणे विठ्ठल भक्तीत झोकून दिले. त्या मंदिराची साफसफाई करत, फुलांचे हार गुंफत आणि भजन-कीर्तनात सहभागी होत. त्यांच्या सुमधुर आवाजातील अभंग ऐकण्यासाठी भाविकांची गर्दी होत असे.

कान्होपात्रांनी अनेक अभंगांची रचना केली. त्यांच्या अभंगांमध्ये आत्मसमर्पण, कारुण्य आणि विठ्ठलावरील नितांत प्रेम दिसून येते. पतितपावन नाव ऐकूनि आले मी दारा या अभंगातून त्यांनी विठ्ठलाकडे आश्रय मागितला, तर जातीहीन मतीहीन, मुळची मी ग पापिण या ओळींतून आपल्या सामाजिक परिस्थितीचे अत्यंत प्रांजळ चित्रण केले. त्यांच्यासाठी विठ्ठल म्हणजे केवळ देव नव्हता, तर तो त्यांचा आधार, रक्षक आणि जीवनाचा केंद्रबिंदू होता. दरम्यान, त्यांच्या सौंदर्याची कीर्ती दूरवर पसरली आणि ती विजापूरच्या बादशहाच्या कानावर पोहोचली. बादशहाने आपल्या सैनिकांना कान्होपात्रांना जबरदस्तीने दरबारात आणण्याचा आदेश दिला. सैनिक पंढरपूरला आले आणि त्यांनी मंदिराला वेढा घातला. या प्रसंगी कान्होपात्रांनी विठ्ठलाचे शेवटचे दर्शन घेण्याची परवानगी मागितली. त्या गाभाऱ्यात गेल्या आणि विठ्ठलाच्या चरणी आर्त प्रार्थना करू लागल्या. नको देवराया अंत आता पाहू, प्राण हा सर्वथा जाऊ पाहे हा त्यांचा प्रसिद्ध अभंग याच प्रसंगाशी जोडला जातो. त्यांनी विठ्ठलाला विनवले की आपल्या भक्तीचा आणि चारित्र्याचा अपमान होण्यापूर्वी त्याने त्यांना आपल्या चरणी सामावून घ्यावे. लोकपरंपरेनुसार, कान्होपात्रांनी विठ्ठलाच्या चरणांवर मस्तक ठेवले आणि त्याच क्षणी त्यांचे अस्तित्व विठ्ठलात विलीन झाले. सैनिक मंदिरात पोहोचले तेव्हा त्यांना केवळ त्यांचा निर्जीव देह दिसला. एका निस्सीम भक्तीने आपल्या आराध्य देवामध्ये एकरूप होण्याचा हा प्रसंग वारकरी परंपरेत अत्यंत श्रद्धेने सांगितला जातो. संत कान्होपात्रांचे जीवन हे भक्ती, स्वाभिमान, त्याग आणि आत्मसमर्पणाचा आदर्श आहे. समाजातील सर्व बंधने आणि अन्याय यांवर मात करून त्यांनी विठ्ठल भक्तीचे सर्वोच्च शिखर गाठले. त्यामुळेच वारकरी संप्रदायात त्यांचे नाव आजही अत्यंत आदराने, श्रद्धेने आणि अभिमानाने घेतले जाते. त्यांच्या जीवनातून प्रत्येकाला हेच शिकायला मिळते की, खरी भक्ती ही जात, पात, कुल किंवा परिस्थिती पाहत नाही; ती केवळ शुद्ध अंतःकरण आणि निस्सीम श्रद्धेवर आधारलेली असते.



संकलन, संतचरणरज...
**श्री. सदाशिव रामनाथ मुळे**
(पुणे युवावार्ता, प्रतिनिधी), मो. ८६६८३२७१७४

# अधिवेशन गाजवणाऱ्या आ. खताळांचा युवा सेनेतर्फे सत्कार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये शेतकरी, कष्टकरी, युवक, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या विविध लोकहिताच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडत आपल्या अभ्यासपूर्ण, आक्रमक व दमदार भाषाशैलीने विधानभवनात ठसा उमटवणारे आमदार अमोल खताळ यांचा युवा सेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

अधिवेशनादरम्यान राज्यातील जनतेशी निगडित विविध प्रश्नांवर आ. खताळ यांनी सरकारचे लक्ष वेधत ठोस भूमिका मांडली. मतदारसंघातील विकासकामे, शेतकऱ्यांच्या अडचणी, बेरोजगारी, शिक्षण, पायाभूत सुविधा तसेच नागरिकांच्या दैनंदिन समस्यांबाबत त्यांनी सभागृहात सातत्याने आवाज उठवला. त्यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीमुळे व आक्रमक भाषाशैलीमुळे अधिवेशनात त्यांच्या भाषणाची विशेष दखल घेण्यात आली.

याच कार्याची दखल घेत युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



यावेळी युवा सेना उपजिल्हा प्रमुख सौरभ देशमुख, तालुका प्रमुख सुशील शेवाळे, शहर प्रमुख सार्थक शेवाळे, तालुका मुख्य संघटक भैया सातपुते, आदित्य पवार, वैभव नायिकवाडी, युवती शहर प्रमुख शिवाज्ञा अरगडे, श्लोक मूळे तसेच युवा सेनेचे अनेक पदाधिकारी, शिवसैनिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खरीप हंगामात उत्पादन वाढीसाठी कृषी विभागाच्या शिफारशीनुसार पेरणी करावी



युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - राहाता तालुक्यातील सर्व सहा मंडळांमध्ये १०० मि.मी. पावसाची नोंद होऊन जमिनीत वापसा स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर खरीप हंगाम २०२६ मध्ये हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन पिकांचे नियोजन करावे व कृषी विभागाने शिफारस केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शास्त्रीय पद्धतीने पेरणी करावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे यांनी केले आहे.

राहाता तालुक्यात गतवर्षी ५७ हजार ०८४ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी झाली होती. त्यामध्ये सोयाबीन २६ हजार २५४ हेक्टर, मका ९ हजार २८५ हेक्टर व कापूस ९ हजार ७०६ हेक्टर क्षेत्राचा समावेश होता. यंदा २५ हजार हेक्टरवर सोयाबीन, ११ हजार हेक्टरवर मका व ९ हजार ६०० हेक्टरवर कापूस लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. उपलब्ध पाणी, जमिनीचा प्रकार, हवामानातील बदल व बाजारपेठेतील मागणी लक्षात घेऊन पिकांची निवड करावी.चपेरणीपूर्वी माती परीक्षण करून मृदा आरोग्य पत्रिकेतील शिफारशीनुसार नत्र, स्फुरद, पालाश, गंधक, झिंक व बोरॉन या अन्नद्रव्यांचा संतुलित वापर करावा. रासायनिक खतांचा अतिरेक टाळून शेणखत, कंपोस्ट, गांडूळखत व जैविक खतांचा वापर वाढवावा. पेरणीसाठी केवळ प्रमाणित व सत्यप्रत बियाण्यांचा वापर करावा. वाणाची निवड करताना उगवणक्षमता, कालावधी व रोगप्रतिकारक क्षमता विचारात घ्यावी. कोरडवाहू क्षेत्रात किमान ७५ ते १०० मि.मी. समाधानकारक पाऊस झाल्यानंतरच घाई न करता पेरणी करावी. शिफारशीनुसार अंतर, खोली व बियाण्याचे प्रमाण ठेवावे. बीजजन्य व जमिनीतून पसरणाऱ्या रोगांपासून संरक्षणासाठी पेरणीपूर्वी प्रथम बुरशीनाशकाची व त्यानंतर रायझोबियम, पीएसबी व ट्रायकोडर्मा या जैविक घटकांची बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे. राहाता तालुक्यात मध्यम ते भारी जमीन असल्याने अतिरिक्त पाण्याचा निचरा, ओलावा संवर्धन व पिकांची एकसमान वाढ यासाठी बीबीएफ पद्धतीचा अवलंब करणे उपयुक्त ठरते.

पिकांच्या वाढीसाठी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचा अवलंब करून पीक अवशेषांचा वापर करावा व नत्राचा विभागून वापर करावा. कीड व रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिवळे व निळे चिकट सापळे, फेरोमोन सापळे व जैविक कीडनियंत्रणाचा वापर करावा. आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यानंतरच रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करावी. पेरणीनंतर ३० ते ४५ दिवसांच्या कालावधीत तणांचे प्रभावी नियंत्रण करावे.

## संपादकीय...

# अश्मयुगापासून दगडांचा वापर अवजारांसाठी

आम्ही खडकांशिवाय कुठे असू? खडकाळ प्रदेशात- रॉक हंटवर जा आणि काही आश्चर्यकारकपणे सुंदर आणि दुर्मिळ असलेल्या खडकांसह तुम्हाला किती भिन्न प्रकार सापडतील ते पहाच. जगभरातील लोकांना खडकांबद्दल अधिक जाणून घेता यावे, यासाठी १३ जुलै हा दिवस आंतरराष्ट्रीय रॉक डे निश्चित करण्यात आला आहे. हे रॉक आणि रोल संगीताबद्दल नाही; हे सर्व दगडांच्या विविधतेबद्दल आहे! शेवटी, खडक पर्यावरणात मोठी भूमिका निभावतात आणि मानवाकडून अनेक वर्षांपासून त्यांचा वापर केला जात आहे. त्याविषयी थोडी थोडकी आस्था असणे अगत्याचे आहे. खडक किंवा दगड हे एक किंवा अधिक खनिजे किंवा खनिज पदार्थांचे नैसर्गिकरित्या घडणारे घन पदार्थ आहेत. उदाहरणार्थ, सामान्य रॉक ग्रॅनाइट हे क्वार्ट्ज, फेल्डस्पार आणि बायोटाइट खनिजांचे मिश्रण आहे. पृथ्वीचा बाह्य घन थर, लिथोस्फियर, खडकापासून बनलेला आहे. संपूर्ण इतिहासात मानवजातीने खडकांचा वापर केला आहे. अश्मयुगापासून दगडांचा वापर अवजारांसाठी केला जात आहे. खडकांमध्ये आढळणारी खनिजे आणि धातू मानवी संस्कृतीसाठी आवश्यक आहेत. जगभरातील लोकांना खडकांबद्दल अधिक जाणून घेता यावे, यासाठी १३ जुलै हा दिवस आंतरराष्ट्रीय रॉक डे निश्चित करण्यात आला आहे. हे रॉक आणि रोल संगीताबद्दल नाही; हे सर्व दगडांच्या विविधतेबद्दल आहे! शेवटी, खडक पर्यावरणात मोठी भूमिका निभावतात आणि मानवाकडून अनेक वर्षांपासून त्यांचा वापर केला जात आहे. त्याविषयी थोडी थोड़ी आस्था असणे अगत्याचे आहे.

खडकांचे तीन प्रमुख गट परिभाषित केले आहेत- अग्निज खडक, गाळाचे खडक आणि रूपांतरित खडक. खडकांच्या वैज्ञानिक अभ्यासाला पेट्रोलॉजी म्हणतात, जो भूविज्ञानाचा एक आवश्यक घटक आहे. ग्रॅन्युलर स्तरावर, खडक खनिजांच्या कणांनी बनलेले असतात, जे यामधून रासायनिक संयुगापासून तयार झालेले एकसंघ घन पदार्थ असतात. जे व्यवस्थितपणे संरचित झालेले असतात. खडक तयार करणारी एकूण खनिजे रासायनिक बंधांनी एकत्र येतात. खडकामध्ये खनिजांचे प्रकार आणि विपुलता हे खडक ज्या पद्धतीने तयार झाले त्यावरून निश्चित केले जाते. अनेक खडकांमध्ये वाळू- सिलिका असते; सिलिकॉन आणि ऑक्सिजनचे एक संयुग जे पृथ्वीच्या कवचाच्या ७४.३ टक्के भाग बनवते. ही सामग्री खडकात इतर संयुगांसह क्रिस्टल्स बनवते. खडक आणि खनिजांमध्ये सिलिकाचे प्रमाण हे त्यांचे नाव आणि गुणधर्म ठरवण्यासाठी एक प्रमुख घटक आहे. आंतरराष्ट्रीय रॉक डेचा इतिहास असा आहे, आंतरराष्ट्रीय रॉक डे हा खडकाचे महत्व उजागर करण्याचा दिवस आहे, जो मानवजातीच्या अस्तित्वासाठी महत्त्वपूर्ण आहे. संपूर्ण इतिहासात खडकांचा वापर केला गेला आहे. अश्मयुगापासून खडक शस्त्रे आणि साधने म्हणून वापरण्यासाठी महत्त्वाचे आहेत. खडकांमध्ये सापडलेले धातू आणि खनिजे मानवी सभ्यतेसाठी महत्त्वपूर्ण- मौल्यवान आहेत. आधुनिक युगात खडक इमारतीच्या पायाभरणीत तसेच बारीक तुकडे करून गिट्टीच्या स्वरूपात रस्ते, पटांगण व स्लॅब सपाटीकरणात वापरले जातात. मूर्तिकार लोक खडकातून सुबक, सुंदर, चित्ताकर्षक मूर्ती घडवितात. रासायनिक रचना, पारगम्यता, घटक कणांचा पोत आणि कण आकार यासारख्या वैशिष्ट्यांनुसार खडकांचे भौगोलिकदृष्ट्या वर्गीकरण केले जाते. हे भौतिक गुणधर्म हे खडक तयार करणाऱ्या प्रक्रियेचे अंतिम परिणाम आहेत. कालांतराने खडकांचे एका प्रकारातून दुसऱ्या प्रकारात रूपांतर होऊ शकते, ज्याचे वर्णन रॉक सायकल नावाच्या भूवैज्ञानिक मॉडेलने केले आहे. या घटना खडकाचे तीन सामान्य वर्ग तयार करतात- अग्निज, गाळाचे आणि रूपांतरित खडके. खडकांचे हे तीन वर्ग अनेक गटांमध्ये विभागलेले आहेत. तथापि, संलग्न खडकांमध्ये कठोर आणि वेगवान सीमा नाहीत. त्यांच्या घटक खनिजांच्या प्रमाणात वाढ किंवा घट करून ते प्रत्येक श्रेणीत एकमेकांमध्ये जातात, एका प्रकारच्या खडकाची विशिष्ट रचना देखील हळूहळू दुसऱ्या खडकामध्ये विलीन होत असल्याचे आढळून येते. म्हणूनच रॉक नामांकन स्थापित करताना स्वीकारलेल्या व्याख्या केवळ सतत पदवीप्राप्त मालिकेतील कमी-अधिक अनियंत्रित निवडलेल्या बिंदूंशी संबंधित असतात.

# सिताई महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यास राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सिताई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावरील कुस्ती स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयासह महाराष्ट्राची मान उंचावली आहे. रोहतक (हरियाणा) येथे आयोजित करण्यात आलेल्या २३ वर्षांखालील राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत महाविद्यालयाचा विद्यार्थी निलेश आहेर याने ८२ किलो वजन गटात उत्कृष्ट कामगिरी करत देशात तृतीय क्रमांक पटकावला आणि कांस्यपदक मिळविले. या यशामुळे महाराष्ट्राचे तसेच सिताई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय पातळीवर झळकले आहे. निलेशने आपल्या मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर जिल्हा, तालुका व गावाचे नाव देशभरात गौरवाने पोहोचविले आहे. नव्याने सुरू झालेल्या शैक्षणिक वर्षातच प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याने मिळविलेल्या या यशामुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थी व शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे अध्यक्ष जनार्दन म्हातारबा आहेर, सचिव सौ. ललिता जनार्दन आहेर तसेच प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर इंगळे यांनी निलेशचे अभिनंदन करून त्याच्या पुढील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

निलेशच्या या यशामागे त्याचे वडील तसेच महाविद्यालयाचे व्यवस्थापक मा. निलेश अशोक आहेर आणि महाविद्यालयाचे सीईओ प्रा. मंगेश विलास वाघमारे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभल्याचे गौरवोद्गार यावेळी व्यक्त करण्यात आले.

# पान 1 वरून जयहिंद लोकचळवळीचा...

शेतकऱ्यांनी केलेले यशस्वी प्रयोग कृषी विद्यापीठांनी अभ्यासून राज्यभर पोहोचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. सह्याद्री फार्म्ससारखी शेतकरी उत्पादक कंपन्यांची यशस्वी मॉडेल्स ग्रामीण भागात उभी राहिली तर शेतीला नवी दिशा मिळेल, असे ते म्हणाले. समूहशेती, प्रक्रिया उद्योग, मूल्यवर्धन आणि सक्षम पणन व्यवस्था यांशिवाय शेतीचा विकास शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांचा सन्मान हा केवळ पुरस्कारापुरता न राहता त्यांच्या कार्यातून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा मिळाली पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पीक विमा, सिंचन प्रकल्प, कृषी पायाभूत सुविधा, कोल्ड चेन, डिजिटल कृषी व्यवस्था आणि महिला शेतकरी सक्षमीकरणासाठी शासन सातत्याने काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांनी केवळ उत्पादनावर न थांबता प्रक्रिया उद्योग, ब्रँडिंग, साठवणूक आणि निर्यातक्षम शेतीकडे वळण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. नाशिक परिसरात जागतिक दर्जाची कृषी बाजारपेठ उभारण्याचे नियोजन सुरू असून, त्यातून शेतमालाच्या विक्रीसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होतील, असे त्यांनी सांगितले. तसेच जागतिक बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या 'MAGNET' प्रकल्पाच्या माध्यमातून कृषी प्रक्रिया उद्योग आणि मूल्यवर्धनाला चालना दिली जात असून, शेतकरी आणि कृषी उद्योजकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

खासदार भास्कर भगरे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून शेतीत वेगळे प्रयोग करणाऱ्या युवा शेतकऱ्यांचे अभिनंदन केले. सह्याद्री फार्म्सचे मॉडेल राज्यातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत, उत्पादनाबरोबर प्रक्रिया उद्योग, ब्रँडिंग आणि बाजारपेठेचे नियोजनही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. पुरस्कार विजेत्यांनी आपल्या अनुभवाचा लाभ इतर शेतकऱ्यांनाही करून द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

त्याचबरोबर, आमदार मनोज कायंदे यांनी पुढे मनोगत व्यक्त करताना जयहिंद लोकचळवळीच्या माध्यमातून कृषी, शिक्षण, सामाजिक आणि युवक क्षेत्रात सुरू असलेल्या उपक्रमांचा उल्लेख केला. राज्यभरातील यशस्वी शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांच्या प्रयोगांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि त्या माध्यमातून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात ही चळवळ अधिक व्यापक स्वरूपात राज्यभर पोहोचेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला-

# आठवण.... पुण्यतिथी निमित्तने

## त्याग, निष्ठा आणि शौर्याचे प्रतीक : बाजीप्रभू देशपांडे



आज बाजीप्रभू देशपांडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्या अद्वितीय स्वराज्यसेवकाला विनम्र अभिवादन! इतिहासाच्या पानांवर अनेक शूरवीरांची नावे सुवर्णाक्षरांनी कोरली गेली आहेत; परंतु स्वतःचा जीव धोक्यात घालून राजे सुरक्षित राहावेत आणि स्वराज्य टिकावे यासाठी मृत्यूशी दोन हात करणाऱ्या बाजीप्रभू देशपांडे यांचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. त्यांनी केलेले बलिदान केवळ एका युद्धातील पराक्रम नव्हते, तर ते स्वराज्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे सर्वोच्च उदाहरण होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी उभे केलेले स्वराज्य हे लाखो सामान्य जनतेच्या त्यागातून साकार झाले. या स्वराज्याच्या पायाभरणीत अनेक ज्ञात-अज्ञात मावळ्यांचे रक्त मिसळले आहे. त्यात बाजीप्रभू देशपांडे यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. पन्हाळगडाच्या वेढ्यातून महाराजांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी त्यांनी घोडखिंडीत उभे राहून शत्रूला रोखले. स्वतःचा शेवट निश्चित असल्याचे माहीत असूनही त्यांनी रणभूमी सोडली नाही. महाराज विशाळगडावर सुखरूप पोहोचल्याची तोफ ऐकूनच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. म्हणूनच घोडखिंड पुढे पावनखिंड म्हणून इतिहासात अमर झाली. आजच्या काळात आपण या इतिहासाकडे किती गांभीर्याने पाहतो, हा मोठा प्रश्न आहे. आधुनिक तंत्रज्ञान, सोशल मीडिया आणि मनोरंजनाच्या गर्दीत अनेक तरुणांना आपल्या इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांची माहितीही नसते. काहींना बाजीप्रभू देशपांडे कोण होते, त्यांनी कोणत्या लढाईत पराक्रम गाजवला, याचाही परिचय नसतो. ही परिस्थिती चिंताजनक आहे. इतिहास म्हणजे केवळ परीक्षा पास होण्यासाठी अभ्यासायचा विषय नाही. इतिहास म्हणजे राष्ट्राचा आत्मा आहे. इतिहासातून प्रेरणा मिळते, संकटांशी लढण्याची ताकद मिळते, स्वाभिमान जागृत होतो आणि राष्ट्रप्रेमाची भावना दृढ होते. ज्यांच्या त्यागामुळे आपण आज मुक्त श्वास घेत आहोत, त्यांचे स्मरण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

आज अनेक तरुण परदेशातील इतिहास, चित्रपट आणि संस्कृतीबद्दल माहिती ठेवतात; पण स्वतःच्या मातीत जन्मलेल्या वीरांचा परिचय मात्र अपुरा असतो. मोबाईलवर तासन्तास वेळ घालवणारी पिढी जर महिन्यातील काही तास इतिहास वाचनासाठी दिले, तर त्यांना बाजीप्रभू, तानाजी मालुसरे, मुरारबाजी देशपांडे, प्रतापराव गुजर, नेताजी पालकर, संताजी-धनाजी यांसारख्या असंख्य वीरांचे प्रेरणादायी जीवन समजेल. त्यातून आत्मविश्वास, नेतृत्व, शिस्त, निष्ठा आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळेल. बाजीप्रभू देशपांडे यांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. त्यांनी स्वतःच्या कुटुंबाचा, सुखाचा किंवा जीवाचा विचार केला नाही; त्यांनी स्वराज्याला प्राधान्य दिले. आज आपण राष्ट्र, समाज आणि कर्तव्य यांच्यापेक्षा अनेकदा वैयक्तिक स्वार्थाला महत्त्व देतो. ही मानसिकता बदलण्यासाठी इतिहासाचे स्मरण आवश्यक आहे.

शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि पालक यांनी मुलांना इतिहासाची गोडी लावली पाहिजे. किल्ल्यांना भेटी, इतिहास व्याख्याने, ग्रंथवाचन, पोवाडे, शिवचरित्र अभ्यास आणि स्थानिक इतिहासाची ओळख यामुळे नवीन पिढीला आपल्या वारशाचा अभिमान वाटेल. इतिहास हा केवळ भूतकाळ नसून भविष्यासाठी दिशा दाखवणारा दीपस्तंभ आहे. पुण्यतिथी हा केवळ हार अर्पण करण्याचा दिवस नसतो; तो त्यांच्या विचारांचे स्मरण करून ते जीवनात उतरवण्याचा संकल्प करण्याचा दिवस असतो. बाजीप्रभूंच्या बलिदानातून आपण निष्ठा, धैर्य, त्याग, कर्तव्य आणि राष्ट्रभक्ती यांचे धडे घ्यायला हवेत. त्यांचे जीवन सांगते की एखादा मनुष्य आपल्या कृतीने शतकानुशतके लोकांच्या हृदयात जिवंत राहू शकतो. आज बाजीप्रभू देशपांडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया-आपला इतिहास जाणून घेऊ, आपल्या मुलांना इतिहास शिकवू, किल्ले आणि स्मारकांचे जतन करू आणि स्वराज्याच्या वीरांचा सन्मान सदैव जपू. कारण जो समाज आपल्या इतिहासाचा सन्मान करतो, तोच समाज उज्ज्वल भविष्य घडवू शकतो. रणझुंजार, स्वराज्यनिष्ठ, पराक्रमाचे मूर्तिमंत प्रतीक वीर बाजीप्रभू देशपांडे यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन! त्यांच्या शौर्याची गाथा प्रत्येक पिढीच्या हृदयात सदैव जिवंत राहो.


**पाहिजेत**
मॉम-एबल फर्टिलिटी अँड आयव्हीएफ सेंटर, संगमनेर
आरएमओ (महिला) – १
शैक्षणिक पात्रता : BAMS / BHMS
नर्सिंग स्टाफ (रात्रपाळी) – १
हाऊसकीपिंग मावशी – २
घर कामासाठी मावशी – १
(सकाळी ९ ते सायंकाळी ५)
— संपर्क —
9860477807

**पाहिजेत**
हिशोब करण्याकरिता दोन मुले पाहिजे
(कॉम्प्युटर येणे आवश्यक)
ए. जी. एस. टोमॅटो सप्लायर्स
टोमॅटो मार्केट यार्ड, संगमनेर
दुकान क्रमांक : १२३४५
7741816770
9763531663

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**
प्रो-माईन्ड एआय आयटी ट्रेनिंग इन्स्टिट्यूटसाठी त्वरित दोन जागा भरणे आहे.
(B.E Comp/IT, BCA/BCS)
— संपर्क —
8282825818

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
AMINA SHAKIL SHAIKH
NEW NAME AS
AMINABI ZAKERIYA SHAIKH
ADD - AKAR COLONY ,RAHEMAT NAGAR, SANGAMNER TAL- SANGAMNER , DIST AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SHABUDDIN CHAND SHAIKH
NEW NAME AS
SHAHABUDDIN CHAND SHAIKH
ADD - VIJAYNAGAR, KURAN ROAD, SANGAMNER TAL- SANGAMNER , DIST AHMEDNAGAR

**पाहिजेत**
घरकामासाठी होतकरू महिला कामगार पाहिजे
वेळ ३ ते ७ मालदाड रोड
डॉ. शेवाळे हॉस्पिटल, विद्यानगर, संगमनेर
9822304638

**पाहिजेत**
पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
– संपर्क –
8888808397

**पाहिजेत**
सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क– जाधव सोनोग्राफी सेंटर मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

**पाहिजेत**
ड्रायव्हर - २ (एल.एम.व्ही.)
क्लर्क - २ (पदवीधर )
अकाउंटट - २ (टॅली)
कॉम्प्युटर ऑपरेटर -२ पदवीधर
डॉ. इथापे हॉस्पिटल, संगमनेर
9822791484
9518556933
9370017177

**ड्रायव्हार पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी 01 जागा
मॅन्युअरल गेअर गाडीसाठी 01 जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
– संपर्क –
9117175050









**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
ANIL ZUMBER AROTE
TO NEW NAME
ANIL ZUMBARRAO AROTE
BY AFFIDAVIT NO 948/2026
DATE 10/07/2026
ADD- A/P HOUSE NO.10, SARANG SOCIETY ,BEHIND HOTEL PRASAD, GHULEWADI, TAL.SANGAMNER -422605

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**भाड्याने देणे**
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत ( तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397

# घाटघर येथे भीषण अपघात

## दुचाकीस्वार तरुणाचा जागीच मृत्यू



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - भंडारदरा परिसरात सध्या पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असताना घाटघर येथील उंबरदरा परिसरात रविवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात २५ वर्षीय दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

रामदास ज्ञानेश्वर सोडणार (वय २५) असे मृत तरुणाचे नाव आहे. रविवारी सकाळी सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास घाटघर येथील उंबरदरा परिसरात दुचाकी आणि नाशिक येथून आलेल्या पर्यटकांच्या ट्रॅव्हल्स वाहनाची समोरासमोर धडक झाली. या अपघातात रामदास सोडणार गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने राजूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच राजूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार श्रीकांत नरोडे व पोलीस कॉन्स्टेबल संभाजी सांगळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला तसेच अपघाताची माहिती घेत पुढील तपास सुरू केला आहे.

दरम्यान, पावसाळ्यात भंडारदरा-घाटघर परिसरात पर्यटकांची मोठी गर्दी होत असल्याने या मार्गावर वाहनांची वर्दळ वाढली आहे. त्यामुळे वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवून वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# यशोधनच्या नोंदणीचा कामगारांना फायदा - संजय कोल्हे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर येथील यशोधन जनसंपर्क कार्यालयामार्फत मागील चार वर्षांपासून असंघटित, बांधकाम व घरेलू कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने काम केले जात आहे. यशोधन मधून १८ हजार कामगारांची नोंदणी करण्यात आली असून मागील एका वर्षात शिष्यवृत्ती योजनेंतर्गत २ कोटी २० लाख रुपयांचा निधी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाला असल्याची माहिती असंघटित कामगार कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय कोल्हे यांनी दिली.

असंघटित कामगारांच्या विविध योजनांबाबत माहिती देताना असंघटित कामगार कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय कोल्हे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील असंघटित, बांधकाम व घरेलू कामगारांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळावा याकरता मागील पाच वर्षांपासून स्वतंत्र सेवा कक्ष सुरू करण्यात आला. या अंतर्गत जनसेवकांनी तालुक्यातील विविध गावांमध्ये जाऊन पात्र व योग्य लाभार्थ्यांची कागदपत्रे संकलित करून ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण केली. या माध्यमातून हजारो कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला.

आमदार सत्यजित तांबे व डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या पाठपुराव्यामुळे विविध शासकीय योजनांचा लाभ पात्र कामगारांपर्यंत पोहोचविण्याचे काम सातत्याने सुरू केले. तसेच अपघातात जखमी अथवा मृत झालेल्या ११ कामगारांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची आर्थिक मदत मिळवून देण्यात आली. याशिवाय नोंदणीकृत कामगारांना विविध गृहउपयोगी साहित्य व इतर योजनांचाही लाभ मिळत असल्याचे आहे. संगमनेर तालुक्यातील अनेक असंघटित व घरेलू कामगारांनी यशोधन कार्यालया मार्फतच नोंदणी केली असून त्यांना घरगुती साहित्य भांडे व योजनांचा लाभ मिळत आहे.

मात्र तालुक्यात नवीन लोकप्रतिनिधी व काही व्यक्तींकडून या कामाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न होत आहे. ज्या कामगारांना लाभ मिळत आहे त्यांना जर विचारले आपण नोंदणी कुठे केली आहे किंवा तुम्हाला योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कोणी प्रयत्न केला आहे त्याचे लोकनेते बाळासाहेब थोरात यांचेच नाव घेतील. ज्या व्यक्तींनी प्रत्यक्ष नोंदणी प्रक्रिया किंवा योजनांच्या अंमलबजावणीत कोणतेही योगदान दिले नाही ते आता मेळावे घेऊन भांडे वाटप करत श्रेय घेण्याचा प्रयत्न करत आहे. वस्तुस्थितीमध्ये यांचे यामध्ये कोणतेही योगदान नाही.

कामगार कल्याण आयुक्तालयाने ज्या कार्यालयांमार्फत किंवा कार्यकर्त्यांच्या माध्यमातून नोंदणीची सेवा उपलब्ध करून दिली त्यांच्यामार्फतच साहित्याचे वितरण व्हावे, अशी मागणी आमदार सत्यजित तांबे यांनी यापूर्वी केली होती. मात्र, संगमनेर तालुक्यामध्ये सत्तेचा दुरुपयोग करून श्रेय घेण्यासाठी भांडे वाटप करून त्याच्यावर त्यांचे फोटो चिटकवले जात आहे हे अत्यंत दुर्दैवी असल्याची टीका त्यांनी केली आहे.



# मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक स्त्रीरोग सेवा - डॉ. सागर कोटकर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये महिलांसाठी अत्याधुनिक स्त्रीरोग व वंध्यत्व (खपषशींळश्रळीू) उपचार सुविधा उपलब्ध असून, त्यामुळे परिसरातील महिलांना व अपत्यप्राप्तीत अडचण येणाऱ्या जोडप्यांना मोठा दिलासा मिळत आहे, अशी माहिती स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सागर कोटकर यांनी दिली. महिलांमध्ये आढळणाऱ्या गर्भाशयातील गाठी, अंडाशयातील गाठी, फॅलोपियन ट्यूब ब्लॉक, गर्भाशयातील पडदा तसेच इतर स्त्रीरोगांवर अत्याधुनिक तपासण्या व शस्त्रक्रिया हॉस्पिटलमध्ये केल्या जातात. सलग एक वर्ष प्रयत्न करूनही गर्भधारणा न झाल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेऊन आवश्यक तपासण्या करून घेणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

MEDICOVER HOSPITALS SANGAMNER





याशिवाय, मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये सुरक्षित प्रसूती (नॉर्मल व सिझेरियन) तसेच अकाली जन्मलेल्या किंवा अतिदक्षता उपचारांची गरज असलेल्या नवजात बालकांसाठी अत्याधुनिक छखउण (नवजात अतिदक्षता विभाग) सुविधा उपलब्ध आहे. हॉस्पिटलमधील अनेक उपचार व शस्त्रक्रिया विविध शासकीय योजनांअंतर्गत उपलब्ध आहेत. त्यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, महाराष्ट्र पोलीस कुटुंब कल्याण आरोग्य योजना आणि एउक्ष्ठ यांचा समावेश असून, पात्र रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरात उपचार दिले जातात. तसेच, ज्या शस्त्रक्रिया शासकीय योजनांमध्ये समाविष्ट नाहीत, अशा गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधी मार्फत आर्थिक मदत मिळवून देण्यासाठीही मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे विशेष सहकार्य केले जाते. मेडिकव्हर हॉस्पिटलच्या केंद्रप्रमुख डॉ. स्नेहल गायके यांनी महिलांनी व संबंधित जोडप्यांनी स्त्रीरोग किंवा वंध्यत्वाच्या समस्या दुर्लक्षित न करता वेळेत तज्ज्ञांचा सल्ला घेऊन उपलब्ध आधुनिक उपचारांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# SJFOI महाराष्ट्र अध्यक्षपदी ओमप्रकाश शिंदे तर सरचिटणीसपदी संजय जोशी यांची निवड

युवावार्ता (प्रतिनिधी): अहिल्यानगर- सीनियर जर्नालिस्ट फेडरेशन ऑफ इंडिया **(SJFOI)**च्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार ओमप्रकाश शिंदे (जालना), तर संजय जोशी (पुणे) यांची राज्य सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अहिल्यानगर येथे झालेल्या महाराष्ट्र कार्यकारिणीच्या बैठकीत राष्ट्रीय सचिव डॉ. जयपाल पाटील यांनी नव्या कार्यकारिणीची घोषणा केली.

यावेळी महाराष्ट्र उपाध्यक्षपदी ड. गोपाळ शेळके, खजिनदारपदी डॉ. जयपाल पाटील तसेच कायदेशीर सल्लागारपदी ड. ओंकार माने व ॲड. सुनील रावडे यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष संदीप दीक्षित आणि निरीक्षक सुहासिनी प्रभूगावकर यांच्या मान्यतेने ही कार्यकारिणी घोषित करण्यात आल्याची माहिती डॉ. पाटील यांनी दिली. तसेच फेडरेशनचे महाराष्ट्र अधिवेशन २५ व २६ नोव्हेंबर रोजी पुणे येथे होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.





बैठकीत राज्यातील विविध विभागांच्या पदाधिकाऱ्यांचीही नियुक्ती जाहीर करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख, आयेशा शेख मुलानी, बालाजी अडियल, अभयकुमार यादव, सौ. भारती शहा आदी उपस्थित होते.

## दिनविशेष

२०१३: — डाकतार विभागाची १६० वर्षांपासूनची तार सेवा बंद झाली.
२००३: सन्दीप चंदा — जागतिक बुद्धिबळ महासंघ द्वारा यांना ग्रँडमास्टर पुरस्कार
१९७६: कॅनडा — देशात मृत्युदंडाच्या शिक्षेवर बंदी घालण्यात आली.
१९५८: इराक — देशामध्ये राजेशाही विरुद्ध उठाव. अब्दुल करीम कासम सत्तेवर.
१८६७: आल्फ्रेड नोबेल — यांनी डायनामाइट स्फोटकाचे यशस्वी परीक्षण केले.
१७८९: फ्रेंच क्रांती — पॅरिस मध्ये नागरिकांनी फ्रेंच राज्यसत्तेचे दडपशाहीचे चिन्ह असलेल्या बॅस्टिल तुरुंगावर हल्ला केला आतील सात बंद्यांची मुक्तता केली. ही घटना म्हणजे फ्रेंच क्रांतीची सुरवात होती.

## जन्म

१९६७: हशन तिलकरत्ने — श्रीलंकेचा क्रिकेटपटू आणि राजकारणी
१९६१: एर्डन एरुस — जगातील पहिली एकट्याने मानव-शक्ती प्रदक्षिणा पूर्ण करणारे
१९२०: शंकरराव चव्हाण — महाराष्ट्राचे ५वे मुख्यमंत्री (निधन: २६ फेब्रुवारी २००४ )
१९१७: रोशन — संगीतकार (निधन: १६ नोव्हेंबर १९६७ )
१९१०: विल्यम हॅना — टॉम अँड जेरीची चित्रे काढणारे चित्रकार
१९०३: कार्लोस प्रियो सोकारास — क्युबा देशाचे अध्यक्ष (निधन: ५ एप्रिल १९७७ )
१८९३: गारिमेला सत्यनारायण — भारतीय कवी आणि लेखक (निधन: १८ डिसेंबर १९५२ )
१८८४: यशवंत खुशाल देशपांडे — महानुभाव वाङ्मयाचे नामवंत संशोधक (निधन: २० नोव्हेंबर १९७० )
१८६२: गुस्टाफ क्लिम्ट — ऑस्ट्रियन चित्रकार
१८५६: गोपाल गणेश आगरकर — थोर समाजसुधारक (निधन: १७ जून १८९५ )

## मृत्यू

२००८: यशवंत विष्णू चंद्रचूड — १६वे सरन्यायाधीश (जन्म: १२ जुलै १९२० )
२००३: रज्जू भैय्या — राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ४थे सरसंघचालक (जन्म: २९ जानेवारी १९२२ )
२००३: लीला चिटणीस — हिंदी चित्रपट अभिनेत्री (जन्म: ९ सप्टेंबर १९०९ )
१९९८: रिचर्ड मॅकडोनाल्ड — मॅकडोनाल्डचे सह-संस्थापक (जन्म: १६ फेब्रुवारी १९०९ )
१९९३: श्रीमंत विजयमाला राणीसाहेब — करवीर संस्थानच्या महाराणी
१९७५: मदन मोहन — भारतीय संगीतकार, संगीत दिग्दर्शक — राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार (जन्म: २५ जून १९२४ )
१९६३: स्वामी शिवानंद सरस्वती — योगी व आध्यात्मिक गुरू (जन्म: ८ सप्टेंबर १८८७ )
१९५४: जॅसिंटो बेनाव्हेंटे — स्पॅनिश नाटककार — नोबेल पुरस्कार (जन्म: १२ ऑगस्ट १८६६ )
१९३६: धन गोपाळ मुखर्जी — भारतीय वंशाचे लेखक आणि विद्वान (जन्म: ६ जुलै १८९० )
१९०४: पॉल क्रुगर — दक्षिण आफ्रिकेचे क्रांतिकारी
१७६६: फ्रॅन्टिसेक मॅक्समिलियन कांका — चेक वास्तुविशारद, वेलट्रुसी हवेलीचे रचनाकार (जन्म: ९ ऑगस्ट १६७४ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**१४ जुलै**

## 'स्पीडी सर्व्हिस'चे प्रणेते : रिचर्ड मॅकडोनाल्ड

जगातील सर्वात मोठ्या फास्ट फूड साखळींपैकी एक असलेल्या मॅकडोनाल्ड्सच्या यशामागे रिचर्ड "डिक" मॅकडोनाल्ड यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांचा जन्म १६ फेब्रुवारी १९०९ रोजी अमेरिकेतील न्यू हॅम्पशायर येथे झाला. त्यांनी आपल्या भाऊ मॉरिस "मॅक" मॅकडोनाल्ड यांच्यासोबत मिळून आधुनिक फास्ट फूड उद्योगाची पायाभरणी केली.१९४० मध्ये दोन्ही भावांनी कॅलिफोर्नियातील सॅन बर्नार्डिनो येथे पहिले McDonald's Bar-B-Q रेस्टॉरंट सुरू केले. व्यवसायातील अनुभवातून त्यांनी मेन्यू मर्यादित करून १९४८ मध्ये "Speedee Service System" ही क्रांतिकारी सेवा सुरू केली. हॅम्बर्गर, फ्रेंच फ्राईज आणि मिल्कशेक यांसारख्या मोजक्या पदार्थांवर भर देत कमी वेळेत, कमी खर्चात आणि दर्जेदार सेवा देण्याची संकल्पना त्यांनी विकसित केली. हीच पद्धत पुढे संपूर्ण फास्ट फूड उद्योगासाठी आदर्श ठरली.१९५४ मध्ये उद्योगपती रे क्रॉक यांनी त्यांच्या व्यवसायाची क्षमता ओळखली आणि फ्रँचायझी विस्ताराला सुरुवात केली. पुढे १९६१ मध्ये रे क्रॉक यांनी मॅकडोनाल्ड बंधूंकडून कंपनीचे पूर्ण हक्क विकत घेतले. त्यानंतर मॅकडोनाल्ड्सने जागतिक स्तरावर झपाट्याने विस्तार केला.रिचर्ड




मॅकडोनाल्ड यांनी आयुष्यभर साधेपणा जपला. त्यांनी प्रसिद्धीपेक्षा नावीन्यपूर्ण व्यवसाय पद्धतीला अधिक महत्त्व दिले. १४ जुलै १९९८ रोजी वयाच्या ८९व्या वर्षी त्यांचे निधन झाले. आज जगभरातील हजारो मॅकडोनाल्ड्स रेस्टॉरंट्सच्या यशामागे रिचर्ड आणि मॉरिस मॅकडोनाल्ड या दोन्ही भावांनी विकसित केलेल्या कार्यक्षम व्यवसाय मॉडेलचा मोठा वाटा आहे.

## गोपाळ गणेश आगरकर : समाजसुधारणेचे निर्भीड पुरस्कर्ते

जन्मदिन विशेष

आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक आणि वैचारिक जडणघडणीत गोपाळ गणेश आगरकर यांचे योगदान अतुलनीय आहे. बुद्धिप्रामाण्यवाद, सामाजिक समता, स्त्रीशिक्षण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा पुरस्कार करणारे ते एक प्रखर समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ, पत्रकार आणि विचारवंत होते. समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद आणि अनिष्ट रूढींविरुद्ध त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला.१४ जुलै १८५६ रोजी सातारा जिल्ह्यातील (सध्याचा सांगली जिल्हा) टेंभू येथे त्यांचा जन्म झाला. अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. १८७८ मध्ये बी.ए. आणि १८८० मध्ये एम.ए. पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी शिक्षण क्षेत्रात कार्य



सुरू केले.भारतात आधुनिक शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने १८८० मध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि इतर सहकाऱ्यांसह त्यांनी 'न्यू इंग्लिश स्कूल' ची स्थापना केली. त्यानंतर १८८४ मध्ये 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' स्थापन करण्यात त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. पुढे ते फर्ग्युसन महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य झाले. शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवून आणता येते, असा त्यांचा दृढ विश्वास होता.पत्रकारितेच्या क्षेत्रातही त्यांनी मोठे योगदान दिले. १८८१ मध्ये सुरू झालेल्या 'केसरी' या वृत्तपत्राचे ते पहिले संपादक होते. मात्र सामाजिक सुधारणांना प्राधान्य देण्याच्या भूमिकेमुळे त्यांचे लोकमान्य टिळकांशी वैचारिक मतभेद झाले. त्यानंतर १८८८ मध्ये त्यांनी 'सुधारक' हे साप्ताहिक सुरू केले. या माध्यमातून त्यांनी बालविवाह, केशवपन, अस्पृश्यता, जातिभेद आणि अंधश्रद्धेविरुद्ध कठोर लेखन केले. विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण आणि विवेकनिष्ठ समाजव्यवस्थेचा त्यांनी ठाम पुरस्कार केला.आगरकर यांचे मत होते की, राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक सुधारणा अधिक महत्त्वाच्या आहेत. समाज सुशिक्षित, विवेकनिष्ठ आणि समतावादी झाल्याशिवाय राष्ट्राची खरी प्रगती होऊ शकत नाही. त्यांच्या या विचारांनी महाराष्ट्रातील समाजप्रबोधन चळवळीला नवी दिशा दिली. १७ जून १८९५ रोजी अवघ्या ३८व्या वर्षी त्यांचे निधन झाले. अल्पायुष्यातही त्यांनी महाराष्ट्राला विवेकवाद, सामाजिक न्याय आणि आधुनिक शिक्षणाचा अमूल्य वारसा दिला. आजही गोपाळ गणेश आगरकर यांचे विचार समाजसुधारणेसाठी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी प्रेरणादायी ठरतात.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा



SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी
क्लॉथ सेंटर सिल्क अँड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपुर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरूम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# समान नागरी कायदा समितीत सर्व संबंधित समाजघटकांचा समावेश करा - माकपची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोल - महाराष्ट्र शासनाने राज्यात समान नागरी कायद्याचा (युनिफॉर्म सिव्हिल कोड) मसुदा तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीत मुस्लिम समाजासह सर्व संबंधित समाजघटकांचे आणि सर्व जाती-धर्मांतील महिलांच्या हक्कांसाठी कार्य करणाऱ्या महिला प्रतिनिधींचे प्रतिनिधित्व नसल्याबद्दल मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने तीव्र नाराजी व्यक्त केली असून समितीची पुनर्रचना करण्याची मागणी केली आहे.

पक्षाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सर्व जाती-धर्मांतील महिलांना समान न्याय, समान हक्क आणि सामाजिक न्याय मिळावा, ही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची ठाम भूमिका आहे. विवाह, घटस्फोट, वारसा, दत्तक, पोटगी यांसारख्या नागरी बाबींमध्ये महिलांना समान हक्क मिळण्यासाठी आवश्यक कायदेशीर सुधारणा होणे गरजेचे आहे. समान नागरी कायद्याच्या चर्चेच्या केंद्रस्थानी महिलांचे हक्क, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय आणि भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्ष मूल्ये असली पाहिजेत, असे पक्षाने स्पष्ट केले आहे.



मात्र, राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीच्या रचनेत मुस्लिम समाजातील कायदेतज्ज्ञ, महिला प्रतिनिधी किंवा सामाजिक तज्ज्ञांना स्थान देण्यात आलेले नाही. तसेच ख्रिस्ती, पारशी आणि इतर अल्पसंख्याक समाजांचे प्रतिनिधित्वही समितीत नसल्याकडे पक्षाने लक्ष वेधले आहे. सर्व जाती-धर्मांतील महिलांच्या हक्कांसाठी कार्य करणाऱ्या महिला प्रतिनिधींनाही समितीत स्थान न दिल्याबद्दल पक्षाने खेद व्यक्त केला आहे.

अशा महत्त्वाच्या विषयावरील कायदा व्यापक सामाजिक स्वीकारार्हता मिळविण्यासाठी मसुदा तयार करण्याच्या प्रक्रियेत सर्व संबंधित समाजघटकांचा सहभाग आवश्यक असल्याचे पक्षाने म्हटले आहे. विशेषतः मुस्लिम समाजातील कायदेतज्ज्ञ, महिला प्रतिनिधी आणि सामाजिक तज्ज्ञ तसेच महिलांच्या अधिकारांसाठी कार्य करणाऱ्या प्रतिनिधींना समितीत समाविष्ट केल्यास कायद्यात सामाजिक न्याय, समान हक्क आणि घटनात्मक संरक्षणाशी संबंधित अधिक प्रभावी तरतुदी करता येतील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने राज्य शासनाकडे समान नागरी कायद्याच्या समितीत मुस्लिम समाजातील पात्र कायदेतज्ज्ञ, महिला प्रतिनिधी आणि सामाजिक तज्ज्ञांचा तातडीने समावेश करावा, सर्व जाती-धर्मांतील महिलांच्या हक्कांसाठी कार्य करणाऱ्या महिला प्रतिनिधींना समितीत स्थान द्यावे, ख्रिस्ती, पारशी व इतर संबंधित समाजघटकांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित करावे, मसुदा तयार करण्याची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक ठेवावी तसेच सर्व धार्मिक, सामाजिक, महिला व कायदेविषयक संघटनांशी व्यापक सल्लामसलत करूनच अंतिम मसुदा तयार करावा, अशा प्रमुख मागण्या केल्या आहेत.

तसेच कोणत्याही एका समाजाला लक्ष्य करण्याऐवजी भारतीय राज्यघटनेतील समानता, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय या मूल्यांच्या आधारेच समान नागरी कायदा तयार करण्यात यावा, असेही पक्षाने स्पष्ट केले आहे.

लोकशाही व्यवस्थेत व्यापक परिणाम करणारा कायदा लोकसहभाग, संवाद आणि सर्वसमावेशकतेच्या आधारेच तयार झाला पाहिजे. त्यामुळे समितीची पुनर्रचना करून त्यामध्ये मुस्लिम समाजासह सर्व संबंधित समाजघटक आणि महिलांच्या हक्कांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महिला प्रतिनिधींचा समावेश करावा, अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने मरियम ढवळे, डॉ. अजित नवले, एम. एच. शेख आणि रेहाना शेख यांनी केली आहे.

# चार हजार सायकलपटूंनी वारीतून दिला आरोग्य, पर्यावरणाचा संदेश

पंढरपूर (वृत्तसंस्था)

आषाढ शुद्ध एकादशी सोहळ्यासाठी राज्यातून अनेक दिंड्या पंढरपूरकडे येत आहेत. अशातच महाराष्ट्र व कर्नाटकातून आलेल्या सुमारे चार हजार सायकलस्वारांनी वारकरी परंपरेप्रमाणे सायकलवरून हरिनामाच्या जयघोषात नगरप्रदक्षिणा घातली. सायकलपटूंनी नगरप्रदक्षिणा तसेच रिंगण सोहळ्यात सहभागी होत एका अभूतपूर्व अनुभवाची अनुभूती घेतली. या सायकल दिंडीचे उद्‌घाटन भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे संचालक पांडुरंग चाटे व आषाढी पंढरपूर सायकलवारी असोसिएशनचे अध्यक्ष उमेश परिचारक यांनी केले. या उपक्रमातून व्यायामासह पर्यावरणाचा संदेश देण्यात आला.



'फिट इंडिया' या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत या दिंडीत सायकल चालविण्याच्या व्यायामाचे महत्त्व पटवून देण्यात आले. जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. सायकल चालविणे हा आरोग्यदायी, पर्यावरणपूरक व किफायतशीर वाहतुकीचा पर्याय असून, नियमित सायकल वापरामुळे शारीरिक तंदुरुस्ती राखण्यास

मदत होते, असा संदेश यावेळी देण्यात आला. सायकलस्वारांमुळे आज पंढरी नगरी वेगळ्याच आध्यात्मिक वातावरणात सामावून गेलेली पाहायला मिळाली. यावेळी पंढरपूरचे तहसीलदार सचिन लंगुटे, पंढरपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, ॲड. श्रीनिवास वायकर, रवींद्र दुसाने नाईक, अभिजित कुलकर्णी, प्रकाश शेटे, महेश भोसले उपस्थित होते. पंढरपूर सायकल क्लब, नाशिक सायकल क्लब आणि बारामती सायकल क्लबने सायकल दिंडीचे उत्कृष्ट नियोजन केले होते. नगरप्रदक्षिणा व रिंगण सोहळ्याचे यावर्षीचे यजमानपद श्रीरामपूर सायकलिंग असोसिएशन यांच्याकडे होते. रविवारी सकाळी सहा वाजता सायकलने नगरप्रदक्षिणेला सुरवात झाली. त्यानंतर सकाळी सात वाजता रेल्वे मैदानावर सर्व समाविष्ट सायकल वारकऱ्यांचा अभूतपूर्व सायकल रिंगण सोहळा पार पडला. यावेळी पंढरपुरात दाखल झालेल्या भक्तांनी सायकलस्वारांचे अभूतपूर्व स्वागत करीत त्यांचे कौतुक केले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

## पान १ वरून "आयाराम"मुळे...

सुरुवातीच्या प्रचारकांच्या त्यागाची आठवण करून दिली. त्या त्यागाचा सन्मान राखायचा असेल तर विचारांशी तडजोड करणाऱ्या प्रवृत्तींपासून संघाने सावध राहिले पाहिजे, असा अप्रत्यक्ष इशाराही त्यांनी दिला.

संघ परिवाराशी जवळचा संबंध असलेल्या व्यक्तीकडून आलेल्या या वक्तव्यामुळे भाजपच्या 'आयाराम' राजकारणावर पुन्हा चर्चा रंगली आहे. स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी भाजपमधील 'आयाराम' संस्कृतीवर अत्यंत परखड शब्दांत टीका करत संघ परिवाराला गंभीर इशारा दिला आहे. ते म्हणाले की, संघाचे कार्य व्यापक हितासाठी आहे. मात्र बाहेरून आलेल्या अनेक व्यक्ती संघ पारवाराचा भाग बनल्या. मात्र, ज्यांना कधी संघाची विचारधारा पटली नाही, हिंदुत्व मान्य नव्हते, अशा व्यक्तींना नैतिकतेचे महत्त्वही समजत नाही. त्यामुळे अशा लोकांच्या वाढत्या प्रभावामळे संघ परिवाराच्या मूळ संस्कारांवर परिणाम होण्याची भीती असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, संघ हा त्याग, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठेच्या विचारांवर उभा राहिलेला आहे. डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांच्यापासून अनेक प्रचारकांनी आयुष्यभर केलेल्या तपश्चर्येच्या बळावर संघ आज या उंचीवर पोहोचला आहे. त्या त्यागाचा सन्मान राखायचा असेल, तर संघाने विचारांशी तडजोड करणाऱ्या प्रवृत्तींबाबत अधिक सावध राहण्याची गरज आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
किडनीच्या आजारांवर संगमनेरमध्ये परिपूर्ण उपचार
डायलिसीस उपलब्ध सुविधा
अत्याधुनिक मशिनरीद्वारे डायलिसीस
• 24x7 Technician
• One Time Blood Tubing Use
• Modern Dialysis Centre
• Nephrologist, AVF Surgery
• Renal Dialysis
• Dialysis Catheter Insertion
स्पेशालिस्ट - डॉ. नागेश अघोर (किडनीविकार तज्ज्ञ) MBBS, MD, DNB, MNAMS
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ ७०३८२७०३८२

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी
अंगावरून पांढरे जाणे
गर्भ न रहाणे
वारंवार गर्भपात होणे
गर्भाशयात गाठी
गर्भाशयाचा कर्करोग
स्तनांची वाढ न होणे
स्तनातून दूध न येणे
स्तनात गाठी
स्तनाचा कर्करोग
योनी मार्गाची दुर्गंधी
गुप्त अंगाला खाज
विविध त्वचा विकार
गुप्तरोग, गर्मी
लघवीला जळजळ
संभोगात रस न येणे
संभोगा विषयीची भीती
हस्तमैथूनाची सवय
लैंगिक विकृती
मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
(३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव)
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25